महाराष्ट्र शासन

## विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ

# नागरिकांची सनद

# १. प्रस्तावना

*शासनाचे अधिनस्त सा.बा. मंडळ यवतमाळ अंतर्गत विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ या कार्यालयाची स्थापना दिनांक २२.२.१९९६ रोजी झाली. या विभागांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील कळंब, आर्णी, दारव्हा व यवतमाळ तालुक्यतील प्रमुखराज्य मार्गाच्या भागाचा या तालुक्यांचा समावशे आहे. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ अंतर्गत खालील सुविधा पुरविण्यास बाधील आहे. ही बांधीलकी विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ या सनदे व्दारा जाहीर करीत असून ती स्विकारत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक वागणुक मिळून उपलब्ध व्हाव्यात नागरीकांची सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावे हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरे समोर ठेवला आहे.*

*१. या विभागांतर्गत राज्य मार्ग लांबी ३३७.२८ कि.मी. प्रमुख जिल्हा मार्ग लांबी १७१.३०० कि.मी. या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती मजबुतीकरण, पुर्णर बांधणी करणे ही विविध कामे जनतेच्या प्रतिनिधी कडून सुचिविले नुसार करुन सुविधा पुरविली जाते असते.*

*२. या विभागांतील शासनाच्या सर्व इमारती क्षेत्राफळ २४९०४.६० चौ. मिटरचे देखभाल दुरुस्ती साठी आहे. या शिवाय जनतेच्या प्रतिनिधीकडून सुचिविण्यात आलेल्या नविन इमारत बांधुन संबंधित खात्याच्या मागणी प्रमाणे तयार करुन देवून सुविधा प्रविणे.*

*३. जनतेच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने विविध ठिकाणी असलेली सिनेमागृहे यांनी नुतनीकरण परवानगी देणे पूर्वी आसन व्यवस्था तपासणी करणे आपातकालीन दौ-याच्या वेळी सभामंडप तयार करुन सविधा पुरविणे जनतेची गा-हाणी ऐकुण घेणे, माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये जनतेनी मागीतलेली माहिती विहीत वेळेत उपलबध करुन देणे. विविध अपीलीय अधिका-याव्दारे माहिती मिळाली नसेल तर गा-हाणी एकूण घेवून निर्णय देणे.*

*४. महारार्ष्टातील सामाजिक न्याय विभागाच्या इमाराती बांधकाम प्रकल्पांची सनियंत्रणाचे काम बांधणे शासनास वेळोवेळी लागणारी माहिती पुरविणे.*

*महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागातर्फे मोठया प्रमणात विविध इमारती कामांचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहे. या कामांना सामाजिक न्याय विभागातर्फे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यता आली असून ही कामे सार्वजनिक बांधकाम उप विभागास बांधकामाकरीता देण्यात आली आहे. ह्या मध्ये खालील इमारतीचा समावेश आहे.*

| *अ.क्र.* | *इमारतीचा तपशिल* | *अंदाजित किंमत (रु. कोटी)* |
|---|---|---|
| *१* | *आर्णी तालुक्याच्या ठिकाणी निवासी शाळा* | *रु. ४४२.११* |

*५. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेले ४ उपविभाग आहे या कार्यालयास तांत्रिक सल्ला देणे, नियंत्रण ठेवणेकामाची अचानक तपासणी करुन गुणवत्ता राखण्याच्या कामी मदत करणे, खर्च योग्य वेळेत होत असल्याबाबत दरमहा बैठक घेवून आढावा घेवून क्षेत्रीय अधिकारी / (उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-१) यांना मार्गदर्शण करणे व वेळावेळी निरिक्षण टिप्पण्या काढून कामातील उणीवा दुरुस्त करणे घेणे.*

*६. लोकप्रतिनीधींना त्यांच्या कार्यक्षेत्रात हवा असणारा बदल, रस्त्याचे देखभाल व दुरुस्ती, रुदीकरण मजबुतीकरण करणे, नविन रस्ते, त्यांच्या मागणी नुसार पूर्ण केला जाईल यासाठी शासन व लोकप्रतिनिधी यांचेशी समन्वय साधणे, त्यांनी केलेल्या तक्रारी मध्ये लक्ष घालून निवारण करणे.*

*७. शासनासाठी माहिती पुरविणारे नियंत्रक कार्यालय असल्याने क्षेत्रीय अधिकारी (कार्यकारी अभियंता) व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता यांचेकडून विविध कार्याक्रमाच्या माहिती मागवून ती संकलीत करुन सा.मा. मंडळ मार्फत शासनास विभागाची व उपविभागाची एकत्रीत माहिती सादर करणे.*

*८. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ तथा नियंत्रक कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचा-यांच्या अडी अडचणी निवारण करण्याच्या दृष्टीने वडीलकीची भुमिका बजावून प्रसंगी चांगल्या केलेल्या कामांसाठी पाठीवर थाप देवून चांगले काम केल्याबद्दल आगावू वेतनवाढीची शिफारस वरिष्ठ कार्यालयास करण्यात येते, त्यामुळे चांगल्या कामासाठी प्रोत्साहन मिळते व कर्मचा-यांच्या गरजेच्या वेळी त्यांना हवे असणारे कामे मिळवून देण्यासाठी मंडळाकडे प्रस्तावित करुन कार्यावाही करणे.*

*९. शासनाची कामे दर्जेदार होण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारास काम मंद असल्यास दंडाची आकारणी करणे बाबत चा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास योग्य वेळी सादर करणे.*

*१०. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ कार्यालयाची व अधीपत्याखालील कार्यलयाची रचना अशी आहे.*

| **विभागीय कार्यालय :** | | **क्षेत्रिय अधिकारी / कार्यालय :** |
|---|---|---|
| *कार्यकारी अभियंता* | *:-* | *उपविभागीय अभियंता सा.बां. उपविभाग क्र.३ यवतमाळ* |
| *विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,* | | *उपविभागीय अभियंता सा.बां. उपविभाग आर्णी* |
| *यवतमाळ* | | *उपविभागीय अभियंता सा.बां. उपविभाग दारव्हा* |
| | | *सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां. उपविभाग कळंब* |

*वर नमुन क्षेत्रीय अधिकारी आपआपल्या कार्यक्षेत्रातील कामांचे देखभाल दुरुस्ती व नविन रस्त्याचे प्रस्ताव लोकप्रतिनिधी कडून प्राप्त करुन शासनाकडे मंजुर करुन घेणेसाठी या विभागामार्फत त्यांचे शिफारशीसह मंडळ कार्यालया मार्फत सादर करण्यात यत असतात.*

*११. क्षेत्रीय अधिकारी त्यांचे अधिका-यांचे सुचनेनुसार कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करीता असतात कामात दोष आढळल्यास तपासणी अधिका-यांनी सुचविलेल्या शिक्षेस सामोर जात असतात.*

*१२. क्षेत्रीय अधिकारी प्रत्यक्ष कामाचं ठिकाणी काम करुन घेण्यासाठी व तांत्रिक मदतीसाठी उपअभियंता व शाखा अभियंता मदत करीत असतात. जनतेच्या सोयीसाठी कामे पुर्ण केली जातात रस्त्याच्या कामामुळे वाहतुक वर्दळ सुरळीत होऊन नागरीकांना सोय उपलब्ध होत असते.*

*१३. माहितीचा अधिकार २००५ अस्तित्वात आल्यानंतर शासनाचे निर्देशानुसार प्रादेशिक विभागा अंतर्गत खालील प्रमाणे आदेश क्र. का५/अधिक्षक/:ममाअ/१७८/दि. १०.१०.२००५ अन्वये सहाय्यक माहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.*

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | नियुक्ती केलेले जनमाहिती अधिकारी यांचे नाव पत्ता कार्या. दुरध्वनी क्रमांक | नियुक्ती केलेले सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नाव पत्ता कार्या. दुरध्वनी क्रमांक | नियुक्ती केलेले प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव पदनाम पत्ता कार्या. दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ | उप कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ | प्रथम लिपीक विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ |
| | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग क्र.३, यवतमाळ | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग क्र.३, यवतमाळ फोन नं. २४२७८२ | उपविभागीय लिपीक सा.बां. उप विभाग क्र.३, यवतमाळ फोन नं. २४२७८२ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ |
| | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग दारव्हा | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग दारव्हा फोन नं. २५४२६२ | उपविभागीय लिपीक सा.बां. उप विभाग दारव्हा फोन नं. २५४२६२ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ |
| | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग आर्णी | उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग आर्णी फोन नं. २६६६१५ | उपविभागीय लिपीक सा.बां. उप विभाग आर्णी फोन नं. २६६६१५ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ |
| | सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां. उप विभाग कळंब | सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां. उप विभाग कळंब फोन नं. २२६४७२ | उपविभागीय लिपीक सा.बां. उप विभाग कळंब फोन नं. २२६४७२ | कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ फोन नं. २४२७८२ |

## २. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळची बांधिलकी

*वरिल १ ते १३ सर्व कर्तव्य पार पाडतांना हे विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ*
*अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधीलकी ठेवील.*

*ब) सौजन्यपुर्ण मदतीची वृत्ती ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.*

*क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.*

*यासाठी वेळोवेळी विविध परवाना पत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यापध्दती, पत्रके नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देईल.*

## ३. नागरिकांची जबाबदारी.

**o)** *शासकिय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणुक सौजन्यपूर्वक असावी.*

**o)** *नागरीकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूणरित्या मिळावी.*

**o)** *नागरीकांचा प्रतिसाद विकासाला दत करणारा असावा.*

**o)** *विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह थरु नये.*

**o)** *सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.*

**o)** *नागरिकांनी स्वेच्छेन अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागेवर अतिक्रमणे करुन नयेत.*

**o)** *रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहिल.*

**o)** *नागरीकांनी कायदेशीर तरतूदी  नियम अलिखीत संकेत यांचे पालन करावे.*

## ४. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळची रचना

*विभागीय स्तरावर कार्यकारी अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असतील,  त्यांचे मुख्य यवतमाळ या ठिकाणी आहे.  जिल्ह्यातील कामाची अमलबजावणी विभागीय कार्यालय करेल व प्रशासकीय नियंत्रण अधीक्षक अभियंता करतील.  या विभागाच्या अधिपत्या खाली  एकूण ४ उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-१, कार्यरत असून त्यांचे प्रतयेकाचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे तालुक्यांचे ठिकाणी असते. सर्वसाधारणपणे प्रत्येक उपअभियंता असतो.  राज्यक्षेत्र स्थानिक क्षत्र यांचे कडील कामासाठी स्वतंत्र उप अभियंता असतात.*

*प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम पुरवित असतो कामांच्या अमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन परिपत्रके इ. चे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिका-यांकडून केले जाते.*

## ५. विशेष प्रकल्प (सा.बां.) विभागाच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक

*ठेकेदारांची नोंदणी, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी लागणारा कालावधी, त्यात सक्षम अधिकारी इ. ची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट ब, क) नमुद केली आहे, अर्जाचा विहीत नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहीत फी भरॅन संबंधीत विभागीय कार्यालयात मिळ शकेल.*

*नैसर्गीक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यस या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होई शकेल.*

## ६. (अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

*कार्यपूर्ती होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी प्रादेशिक विभागाबाबत अथवा काही कालाबाबत असतील तर, त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिट कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रार असेल त्या कार्यलयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार प्राप्त झाल्यास त्याचे त्वरीत निवारण करण्यात येते.*

*अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ*

*कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, यवतमाळ हे त्यांचे कार्यालयात वेळेत ३ ते ५ या दरम्यान प्रत्यक्ष भेट घेवून गा-हाणी एकूण घेतील.*

## (ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

*या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा.बां मंडळ घेतात.*

## (क) जनसामान्यांकडून सुचना

*ही नागरिकांची सन सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांच्या गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणण्यात बाधील राहील. ही नागरिकांची सनद स्वत:हून काही नविन कायदेशीर हक्क निमार्ण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सा.बां. मंडळाच्या सेवा उपभोगाच्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करेल.*

# ७. नागरिकांच्या सनदेची अमलबजावणी.

*कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग या नागरिकांची सनदेची अमलबजावणी साठी हे विभाग कार्यालय कटिबध्द राहील.*

*विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग यवतमाळ खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. प्रादेशिक विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौज्यन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणेक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकभिमुख सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्हा घेवून तो शासनास सादर केल्या जाईल. भ्रष्ट्राचारास शासनामार्फत आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.*

# परिशिष्ट - अ

**कार्यकारी अभियंता,**
**विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग यवतमाळ**

**विभागा अंतर्गत असणारे उपअभिंता**
**(तालुकानिहाय कार्यक्षेत्र)**

| *उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग क्र.३, यवतमाळ* | *उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग दारव्हा* | *उपविभागीय अभियंता सा.बां. उप विभाग आर्णी* | *सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां. उप विभाग कळंब* |
|---|---|---|---|
| *यवतमाळ तालुक्यातील प्रमुख राज्य मार्ग* | *दारव्हा तालुका* | *आर्णी तालुका* | *कळंब तालुका* |

# परिशिष्ट - ब

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग ७, ८, ९ आणि मजुर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची परिक्षा उत्त्ीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण. | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २ | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| ३ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतींचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ४ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ५ | चलचित्रपट गृहाचे योग्यता प्रमाणपत्र. | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ६ | सरकारी इमारतीचे ना उपलब्ध प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ७ | रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ८ | इमारतींच्या भाडयांचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ९ | इमारतींच्या मुल्यनिश्यितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |